7:49 PM

# अनुक्रमणिका

## भाग - ३


● संपादकीय - डॉ.स्नेहल तावरे - डॉ. शिवलिंग मेनकुदळे - डॉ. संजय नगरकर - डॉ. सविता पाटील ..९

१. प्रभावी आणि पुरोगामी व्यक्तिमत्व :- डॉ.वृंदा केळकर ..११
इरावती कर्वे

२. अहिल्याबाई होळकरांचे सामाजिक- प्रा.सुवर्णा खोडदे ..१५
क्षेत्रातील योगदान

३. स्वप्न माऊली - प्रा. संग्राम गोसावी ..१९
सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

४. मराठी साहित्यातील बंडखोर - प्रा. बाळासो मुनार ..२३
लेखिका : गौरी देशपांडे

५. स्वप्न माऊली लक्ष्मीबाई पाटील - प्रा. मधुरा मेस्त्री ..२७
यांचे जीवन आणि कार्य

६. समाजसेवी मदर तेरेसा यांचे - प्रा. नलिनी पाचर्णे ..३०
सामाजिक कार्यातील योगदान

७. अपंगांचे मानवी हक्क आणि - प्रा. वैशाली सुपेकर ..३४
नसीमा हुरजूक यांचे कार्य

८. समाजसेवी : साधनाताई आमटे - प्रा. मानसेन रणदिवे ..३७

९. महिला सक्षमीकरण व - प्रा.निलेश वाकचौरे ..४०
सक्षमीकरणातील नीलिमा मिश्रा यांचे योगदान

१०. मेरी कोम - प्रा.विशा गाडे ..४४

११. अहिल्याबाई होळकर यांचे - प्रा. कल्पना रोकडे ..४६
योगदान

१२. कर्तृत्ववान महिला : - प्रा. नंदकुमार उबार ..५०
सावित्रीबाई फुले

१३. रझिया सुलतान - प्रा. सुनीता घोसले ..५३

१४. महाभारतकालीन - प्रा. दिलीप कोरे ..५७
शकुंतलेचा आदर्श

१५. भारतीय स्त्री इतिहासकार : - प्रा. सविता धेंड ..६१
रोमिला थापर

१६. जागतिक आघाडी क्षेत्रातील - प्रा.मयूर माळी ..६५
सामाजिक महिलांचे जीवनातील योगदान

१७. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : - प्रा. विलास नावरे ..६९
सामाजिक दृष्टिकोनातून अवलोकन

१८. इंदिरा गांधींचे भारतीय - प्रा.रमेश बोरात ..७३
लोकशाहीतील योगदान

१९. भारतीय आघाडी क्षेत्रातील - प्रा.गौरी पवार ..७७
महिलांचे सामाजिक जीवनातील योगदान

२०. महाराष्ट्रातील समाज सुधारणेत - प्रा.संदीप नगारे ..८०
स्त्रियांचे योगदान

२१. सुनीता अरळीकर यांचे सामाजिक - प्रा. महादेवी धारक ..८४
आणि वाङ्मयीन योगदान

२२. विज्ञान जगतातील आदर्श स्त्री - - प्रा. योगेश्री कोकरे ..८८
डॉ. रोझलिंड फ्रँकलिन

२३. क्रांतिज्योती सावित्रीबाई रोडे - प्रा.विकास टकले ..९२
यांचे शैक्षणिक कार्याचा अभ्यास

२४. निर्मला करार यांचे स्त्री सुधारणा - प्रा. अमोल बोडे ..९६
विषयक कार्य

२५. शास्त्रीय संगीत क्षेत्रातील - प्रा. विनायक वायद ..९९
गोमंतकीय स्त्रियांचे योगदान

२६. गोवा मुक्तिसंग्रामात शारदाबाई - प्रा.स्नेहा जांबोटकर ..१०३
सावईकर व सिंधुताई देशपांडे यांचे योगदान

२७. शांता नाईक कोळंबकर आणि - प्रा.चित्रिता महात्मे ..१०७
डॉ.जयंती नाईक यांचे कोंकणी साहित्य
क्षेत्रातील योगदान

२८. स्त्री समाजसुधारक ताराबाई शिंदे - प्रा. रघुनाथ घाडगे ..१११

२९. भारतीय महिला क्रिकेट क्षेत्रातील - प्रा. एकनाथ झावरे ..११४
चमकता तारा : मिताली राज

३०. तपस्वी कर्मयोगिनी : - डॉ.अरुण कोळेकर ..११८
राजमाता अहिल्याबाई होळकर

३१. समाजसुधारक : रमाबाई रानडे - प्रा.आशाताई शेवाळे ..१२२
यांचे महिलांच्या हक्कांसाठीचे योगदान

३२. स्त्री शिक्षणाची क्रांतिज्योती : - प्रा.प्रदीप दुधके ..१२६
सावित्रीबाई ज्योतिराव फुले

३३. बहिणाबाईंची कविता - प्रा. विलास सुर्वे ..१३०

३४. बहिणाबाईंचे मराठी - प्रा. लक्ष्मी पवार ..१३३
साहित्यातील योगदान

३५. नकुबाई मालिक यांचे - प्रा.निलेश संगोरे ..१३७
आदिवासी क्षेत्रातील योगदान

३६. कर्मयोगिनी जानकीबाई - डॉ. विकास पाटील ..१४१
तथा आक्का शेटये

३७. आदिवासींची सेवा करणाऱ्या - प्रा.विशाखा हेंद्रे ..१४५
सेवाव्रती : डॉ. राणी बंग

३८. राजमाता अहिल्याबाई होळकरांचे - प्रा.पोपट झोंबाडे ..१४९
सामाजिक-धार्मिक योगदान

३९. समाजाभिमुख कार्यकर्ती : - प्रा. श्वेता चौधरी ..१५३
निर्मलाताई

४०. संत वाङ्मयातील जाईंची वेल : - प्रा.दादा साठे ..१५७
संत जनाबाई

४१. महाराष्ट्रातील कृषिक्षेत्रात - प्रा. तुकाराम आघाव ..१६१
महिलांचे योगदान : एक अभ्यास


Scanned with CamScanner

रोग्यांना दवाखान्यात आणून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी झटत होत्या. त्यांचा दत्तक पुत्र डॉक्टर यशवंत हा प्लेगच्या रोग्यांवर वैद्यकीय सेवाधर्माने उपचार करीत होता. प्लेगच्या रोग्यांना जीवनदान देताना सावित्रीबाईंना प्लेगने झडप घातली आणि त्यातच १० मार्च १८९७ रोजी त्यांचे देहावसान झाले."[1] आपल्या जन्मापासून अखेरच्या क्षणापर्यंत सामाजिक सेवेचे घेतलेले व्रत सावित्रीबाईंनी पाळले. खरोखर भारतीय स्त्री-शूद्रांच्या मुक्तीसाठी स्वतः:चे आयुष्यपणाला लावणारे फुले दांपत्य होते. या संदर्भात डॉ. मा. गो. माळी म्हणतात, "या देशात स्त्रीमुक्ती आंदोलनात वाहून घेणारा भारतीय इतिहासातील महात्मा फुले हा पहिला पुरुष होय आणि सावित्रीबाई या पहिल्या स्त्री होत. स्त्रीदास्य विमोचनाचा स्फोट प्रथम सावित्रीबाईंनी केला."[5] फुले दांपत्याने केलेल्या कार्याला भारतीय इतिहासात तोड नाही. या अनुषंगाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्याचा आढावा घोषितकर्त्या आढावा घेणे मला महत्त्वाचे वाटते.

ccc


संदर्भ ग्रंथ :

१. चोले राजसाहेब, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, आवृत्ती : मे २०००, पृ. ५५.
२. माळी मा. गो., उनि., पृ.३८-३९
३. तत्रैव, पृ.३९-४०
४. चोले राजसाहेब, उनि., पृ.६४
५. माळी मा. गो., उनि., पृ.६५




# रझिया सुलतान


- प्रा. सुनीता भोसले (गंगथडे)


रझिया सुलतान ही मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील दिल्लीच्या सिंहासनावरून भारतावर राज्य करणारी पहिली महिला होती. इस्लामी जगतात एका स्त्रीने राज्यारोहण केले हे आश्चर्यकारक होते. रझिया एक महान शासनकर्ती, न्यायप्रिय, मुत्सद्दी, कर्तबगार, धाडसी, बुद्धीमान, महत्त्वाकांक्षी करारबाणी, तडफदार, राज्याच्या हिताचे रक्षण करणारी राज्यकर्ती स्त्री होती. मुस्लिम राज्यकर्ती म्हणून गादीवर आल्यावर रझियाला अनेक बंडांना तोंड द्यावे लागले. तिने सर्व बंडे मोडून काढून दिल्ली सल्तनतवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. रझियाचे नेतृत्व व प्रभुत्व पाहून चाळीस गनी गटाचे सरदार तिचा द्वेष करू लागले. तुर्की सरदारांना एका महिलेच्या नेतृत्वाखाली काम करणे मान्य नव्हते. रझियाची वाढती शक्ती तसेच पडदा पद्धत न पाळता दरबारात वावरणे काही मुस्लिम सरदारांना मान्य नसतानाही रझियाने त्यांची पर्वा केली नाही. रझियाचे वाढते सामर्थ्य आपल्या हिता आड येत आहे हे पाहून तुर्की सरदारांनी तिचा शेवट केला.

गुलाम घराणे :-

इ.स. १२०६-१५२६ हा दिल्ली सुलतानशाहीचा कालखंड मानला जातो. मुहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर इ.स. १२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबक यांनी गुलाम घराण्याची स्थापना केली. भारतातील तुर्की साम्राज्याचा वास्तविक संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक होय. कुतुबुद्दीन ऐबकनंतर त्याचा मुलगा आरामशहा गादीवर आला. आरामशहाच्या कारकीर्दीत गोंधळ निर्माण झाला. कुतुबुद्दीन ऐबकाच्या मुलीचा विवाह शमसुद्दीन अल्तमश सोबत झाला होता. दिल्ली येथील सुभेदारांनी अल्तमशला राज्याची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली. त्यानुसार अल्तमश दिल्लीला आला आणि त्यांनी दिल्लीजवळील जुडच्या मैदानावर आरामशहाचा पराभव केला. अल्तमश सुलतान पदावर विराजमान झाला तो अत्यंत शूर व कर्तबगार होता.

शमसुद्दीन अल्तमश :-

गुलाम घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान शमसुद्दीन अल्तमश मानले जाते. तुर्की साम्राज्याला स्थिरता प्राप्त करण्याचे काम अल्तमशने केले. शमसुद्दीन



अल्तमशचा मोठा मुलगा नासिरुद्दीन महंमद हा इ.स. १२२९ मध्ये मरण पावला इतर मुले राज्यकारभार करण्यास लायक नाहीत असे पाहून अल्तमशने आपली मुलगी रझिया हिला वारस नेमले. स्त्रीला वारस नेमणे हा प्रयोग नवीन होता आणि मुसलमान धर्माला धरून नव्हता. अल्तमशच्या मृत्यूनंतर दिल्ली दरबारातील अमिरांनी त्याचा निर्णय धुडकावून अल्तमशचा दुसरा पुत्र रुक्नुद्दीन फिरोजशहा याला सुलतान म्हणून घोषित केले. रुक्नुद्दीन फिरोजशहाची आई शाह तुर्कानने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. राज्यकारभार चालविण्यास लायक नसलेल्या रुक्नुद्दीनच्या काळात राज्यात प्रचंड अंदाधुंदी व गोंधळ निर्माण झाला. दिल्लीतील प्रजा दरबारातील अमीर आणि लष्करी अधिकारी या सर्वांना रुक्नुद्दीन फिरोजशहा व शाहतुर्कान यांना कैद केले. ९ नोव्हेंबर १२३६ रोजी कैदेतच त्यांचा अंत झाला.

रझिया सुलतान :

रझियाचा जन्म इ.स. १२०५ मध्ये बुदून, उत्तर प्रदेश येथे झाला. १० नोव्हेंबर १२३६ रझिया सुलतान बनली. वडिलांबरोबर दरबारात उपस्थित राहिल्यामुळे रझियाला राज्यकारभाराचा अनुभव प्राप्त झाला होता. राज्यकर्त्यांना लागणारे सर्व गुण रझियाच्या अंगी होते. त्या काळातील इस्लामी परंपरांची व सनातनी उलेमांकडून होणाऱ्या विरोधाची पर्वा न करता अल्तमशने तिला आपला वारस नेमले होते. एका स्त्रीने आपल्यावर हुकूमत गाजवावी हे तुर्की उमरावांना त्यांच्या प्रतिष्ठेला बाधक वाटत होते. म्हणून अल्तमशच्या मृत्यूनंतर तिचा वारसा हक्क त्यांनी मान्य केला नाही. पण रुक्नुद्दीन फिरोजच्या नाकर्तेपणाने व अहितकेने तिला पदग्रहणापूर्वी पुढे येण्यास वाव मिळाला. मुलतान, बदाऊन, हांसी, लाहोरचा सुभेदार, प्रधानमंत्री मुहम्मद जुनैदी, मलिक सालारी, मलिक कुची हे अमीर रझियाला विरोध करीत होते.

बंडखोरांचा नाश :

बंडखोरांनी रझियाला सुलतान पदावरून खाली खेचण्याचा प्रयत्न सुरू केला. रझियाने मोठ्या धैर्याने कूटनीतीचा वापर करून ही समस्या सोडविण्याचे ठरविले. त्यानुसार तिने सर्वप्रथम बंडखोर सुभेदार व अमीर यांच्यामधील परस्परातील मतभेद, ईर्षा व महत्त्वाकांक्षा यांचा फायदा घेण्याचे ठरविले आणि त्यांच्यात फाटाफूट केली. एजुद्दीने सालारी, कबीरखाँ यांना बंडखोरांपासून अलग करून त्यांना आपल्या बाजूकडे खेचले. खोटा प्रचार करून तिने बंडखोरांच्या सैन्यात खळबळ माजवून दिली. त्यामुळे बंडखोरांचे नेते व सेनापती परस्परांकडे संशयी वृत्तीने पाहू लागले. याचवेळी रझियाने तातडीने बंडखोरांच्या सैन्यावर हल्ला केला. रझियाने आपल्या सुभेदार पदावर नुसरतउद्दीन तायासी याची नियुक्ती केली होती. त्याने रझियास सहकार्य करून बंडखोरांवर आक्रमणे केली. शेवटी रझियापुढे बंडखोरांना निभाव लागला नाही, त्यांचा पराभव झाला. लाहोरचा



सुभेदार मलिक जानी याला कैद करण्यात आले व त्याचा वध केला गेला. प्रधानमंत्री मुहम्मद जुनैदी हे सिरमूरच्या डोंगरात पळून गेले व गुप्त झाले. अशा प्रकारे बंडखोर सुभेदार, अमीर प्रधानमंत्री यांचे बंड मोडून टाकण्यात रझियाला यश मिळाले.

सत्तेचे सुदृढीकरण :

रझियाने दरबार व राज्यातील मोठमोठ्या पदावर आपल्या विश्वासातील व्यक्तींची नियुक्ती केली आणि त्यांच्या सहकार्याने आपली सत्ता मजबूत करण्याचा प्रयत्न केला. ख्वाजा मुहाजबुद्दीन यास वजीर पद मलिक सैफुद्दीन राज्याचा सेनापती (अल्पाकर्धीन मृत्यू) कुतुबुद्दीन हसन घोरी, जमालुद्दीन याकूत यांना अश्वशाळेचे (अमीर आखूर) प्रमुखपद देण्यात आले. राज्यातील मलिक व अमीर यांचे सुलतानावर वर्चस्व असू नये तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यावर सुलतानांचे वर्चस्व असावे असे रझियाचे मत होते.

रझियाच्या पाडावाची कारणे :

१) दरबारातील तुर्की अमिरांचे वर्चस्व कमी करण्यासाठी रझियाने गैरतुर्की लोकांच्या नेमणुका अमीर व मलिक पदावर केल्या होत्या. अबिसिनीयाच्या हब्शी जमालुद्दीन याकूत याला अश्वशाळेचे प्रमुख पद दिले. याकूत बरोबर अधिक स्नेहसंबंध वाढविल्यामुळे तुर्की अमीर असंतुष्ट झाले.

२) दरबारातील तुर्की अमीरांना सुलतान आपल्या हातातील बाहुला असावा असे वाटत होते. रझियाने तुर्की अमीर व मलिक यांच्यावर स्वतः:चे वर्चस्व निर्माण केले. एका स्त्रीच्या वर्चस्वाखाली राहणे अमीरांना सहन झाले नाही.

३) रझियाने पडदा पद्धतीचा त्याग केला. पुरुषांचा पोशाख घालण्यास सुरुवात केली. घोडा आणि हत्तीवर स्वार होऊन ती युद्धामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊ लागली. तसेच प्रजेत प्रत्यक्ष वावरू लागली. त्यामुळे अमीर आणि कट्टर मुसलमान नाराज होणे साहजिकच होते.

रझियाचा पाडाव - (इ.स.१२४०)

दरबारातील मलिक, तुर्की अमीर, प्रांतीय सुभेदार यांच्यात रझिया विरुद्ध असंतोष पसरला होता. त्यामुळे त्यांनी रझिया विरोधात विद्रोह करण्याचे ठरविले. या बंडाचे नेते बदाऊनचा हकीम मलिक इख्तियारुद्दीन एतिगीन हे होते. त्याच्याच नेतृत्वाखाली रझियाविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात झाली. रझियाच्या बाजूने दिल्लीची जनता होती. रझियाचा पाडाव दिल्लीत तिच्या उपस्थितीत शक्य नाही म्हणून ठरलेल्या योजनेनुसार सर्वप्रथम लाहोरचा सुभेदार कबीरखाँ यांनी रझियाविरुद्ध बंड केले. रझियाने लाहोरवर हल्ला करून कबीरखाँचा पराभव केला.

भटिंडाचा शासक मलिक अल्तुनियाने बंड केले. हे बंड मोडण्यासाठी रझिया भटिंडावर आक्रमण करण्यासाठी निघाली. इकडे शाही अश्वशाळेचे




Scanned with CamScanner

7:49 PM 90

प्रमुख हबशी जमालुद्दीन याकूत यांची हत्या केली. एप्रिल १२४० रोजी रझियाला कैद करून भटिंड्याच्या किल्ल्यात ठेवण्यात आले. रझियावर कडेकोट नजर ठेवण्याची कामगिरी भटिंड्याचा शासक मलिक अल्तुनिया यांच्यावर सोपविली.

रझियाला कैद केल्यानंतर दिल्लीत अल्तमशचा तिसरा पुत्र बहरामशाह याला दिल्लीचा सुल्तान म्हणून घोषित केले. रझिया कैदेत असताना शांत बसली नाही. तिने अल्तुनियाशी विवाह केला. अल्तुनियाने व रझियाने दिल्लीवर आक्रमण केले; परंतु १३ ऑक्टोबर १२४० रोजी अल्तुनिया व रझियाचा कैथलजवळ पराभव झाला. यानंतर हे दोघेही भटिंड्याकडे पळून गेले, परंतु १५ ऑक्टोबर १२४० रोजी हिंदू बंडखोरांनी रस्त्यातच त्यांचा वध केला. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अत्यंत वाईट व दुर्दैवी घटना म्हणून या घटनेचा उल्लेख केला जातो.

**निष्कर्ष :**

- दिल्लीच्या सिंहासनावर सार्वभौम शासक म्हणून राज्य करणारी रझिया ही पहिली व शेवटची स्त्री होती.
- रझिया बुद्धिमान, न्यायप्रिय, दानशूर, विद्वानांची आश्रयदाती लोककल्याणकारी, महान सेनानी, प्रजापालक महान सम्राज्ञी होती.
- राजनीतिविशारद होती. चाळीस अमीरांच्या दलासारखेच गैरतुर्की लोकांचे एक दल रझियाने उभारले असते तर रझियाचा पाडाव झाला नसता. राज्यकारभार चालविण्यास ती समर्थ होती. परंतु एका स्त्रीने राज्य करावे ही कल्पना तुर्क लोकांना रुचली नाही. याच कारणाने रझियाचे पतन झाले. तिचे स्त्रीत्व हेही तिच्या अधोगतीचे एक कारण होते.


**संदर्भ ग्रंथ:-**

१) डॉ. वी.डी. महाजन, मध्यकालीन भारत मा.कृ., पारधी (अनुवादक) मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, के सागर, खंड पहिला.

२) डॉ. अनिल कठारे, दिल्ली सुल्तानशाहीचा इतिहास (इ.स. १२०६-१५२६) प्रशांत पब्लिकेशन्स

३) डॉ. कृ.अं. आचार्य, डॉ. भा. कृ. आपटे, मध्ययुगीन भारत

४) डॉ. वसंत तुकाराम देशपांडे, मध्ययुगीन भारताचा इतिहास अभय प्रकाशन, नांदेड

५) प्रा. प्रभाकर कृ. हनजे, मध्यकालीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर-२

६) प्रा. गजानन भिडे, डॉ. विजय कलवाडे, डॉ. सौ. वैजयंती नाईक नवरे मध्ययुगीन भारत (सामाजिक, सांस्कृतिक, इतिहास)




# महाभारतकालीन शकुंतलेचा आदर्श

- प्रा. दिलीप कोने

स्वाभिमानी व धाडसी विद्वान अशा महाभारतकालीन शकुंतलेच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते. स्वतःच्या अधिकाराची जाणीव असणारी व पुत्राच्या अधिकारासाठी संघर्ष करणाऱ्या शकुंतलेचा उल्लेख महाभारत कथानकातील विदुषी स्त्री असा करावा लागेल. पौरव कुळाचा आदिसंस्थापक हा दुष्यंत राजा होता. तो संपूर्ण पृथ्वीच्या चौथ्या भागावर राज्य करीत होता. समुद्राकाठी असलेल्या देशावरही या राजाने स्वामित्व प्राप्त केले होते. एकदा राजा दुष्यंत शिकारीसाठी बाहेर पडतो व एका हरणाचा पाठलाग करीत कण्व ऋषींच्या आश्रमात पोहचतो. आश्रमात कोणीही दिसेना म्हणून राजा दुष्यंताने मोठ्याने येथे कोणी आहे का? असे विचारले. राजाचा महाशब्द ऐकून एक तापसी वेष धारण केलेली कन्या आश्रमातून बाहेर येते. राजाचे स्वागत करते. पूजा करते. हात जोडून नम्रतापूर्वक काय आज्ञा आहे असे विचारते. राजाने शकुंतलेला प्रश्न केला, "की तू कोण आहेस?" ती म्हणते, "मी कण्व मुनींची कन्या आहे." राजाला प्रश्न पडतो की महर्षी कण्व तर ब्रह्मचारी आहेत मग ही कन्या कशी? तेव्हा शकुंतलेने आपल्या जन्माचा पूर्ण वृत्तांत सांगितला आणि आपण महर्षी विश्वामित्र व अप्सरा मेनका यांची पुत्री असल्याचे सांगितले. मेनकेने आपल्याला मालिनी नदीच्या तीरावर ठेवून निघून गेल्यावर शकुंत पक्ष्यांनी रक्षण केले. म्हणून कण्व ऋषींनी मला आपल्या आश्रमात आणून माझे नाव 'शकुंतला' असे ठेवले.

शकुंतलेच्या जन्माबद्दलची माहिती ऐकून राजा दुष्यंतने तिच्या रूपाचे वर्णन करीत "तू भार्या हो मी तुला जे काही मागशील ते देईन. एवढेच काय माझे सर्व राज्य तुझ्या स्वाधीन करीन. पण तू माझ्याशी विवाह करण्यास तयार हो." याप्रमाणे शकुंतलेच्या रूपसौंदर्यावर मोहित झालेल्या राजा दुष्यंताने शकुंतलेला विवाहाची मागणी घातली. त्यावेळी शकुंतलेने धैर्याने राजास सांगितले की, राजन, "माझे बाबा बाहेर गेले आहेत. बाबा आल्यावर मला तुम्हास अर्पण करतील." शकुंतलेने राजाला कण्व ऋषींची वाट पाहण्यास सांगितले. परंतु राजा इतका अधीर झाला होता की तो कण्व ऋषींची वाट पाहण्यास तयार



Scanned with CamScanner



22[th]

## International Interdisciplinary Conference

### Theme

**'The Contribution and Achievements of Women in Various Fields at National and International Levels '**



Organized by

**Rayat Shikshan Sanstha's**
**Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,**
**Aundh, Pune**

and

**Snehavardhan Research Institute**
**Pune, India**

## *Certificate of Participation*

This is to certify thatàm प्रा. सुनिता विठ्ठलराव भोसले participated

and presented the Research Paper on

' रझिया सुलतान '

in the International Interdisciplinary Conference on Sunday 15[th] December, 2019 at Aundh, Pune .

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr. Snehal Tawre**<br>President<br>Snehavardhan Research Institute, Pune | **Dr. Savita Patil**<br>Head<br>Department of English<br>Aundh, Pune | **Dr. Sanjay Nagarkar**<br>Head and Vice Principal ,<br>Department of Marathi<br>Aundh, Pune | **Dr. Shivling Menkudale**<br>Principal<br>Dr. Babasaheb Ambedkar College, Aundh, Pune |

Scanned with CamScanner